| **दि.कि.अर्ज क्र.६६/२०२० मधील निशाणी क्र.४०**<br>**खालील आदेश**<br>**(सखाराम आरगडे विरुध्द भगवान आरगडे व इतर)** | MHAH140015642020 |
|---|---|

सदरचा अर्ज सामनेवाला क्र.१अ ते १इ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाल्याचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाला यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, अर्जाबाबत महत्त्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत न मिळाल्याने ते मुदतीत म्हणणे दाखल करु शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विना म्हणणे आदेश पारित करण्यात आला. सबब, सामनेवाला यांच्याविरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जातील कारण खरे नाही. अर्जदाराचे नुकसान व्हावे, अर्ज प्रलंबित करावा या हेतूने सदरचा अर्ज दिलेला असल्याने नामंजूर करण्यात यावा. मंजूर केल्यास जास्तीत जास्त दंड आकारावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत अर्ज दिवाणी स्वरुपाचा असून अर्जाची गुणदोषावर पुर्णतः चौकशी

होणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार सामनेवाला यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सामनेवाला क्र.१अ ते १इ यांच्याविरुध्द दाव्यात झालेला विना म्हणणे आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१अ ते १इ यांनी अर्जदाराला दंडापोटी रक्कम रुपये ५००/-(रक्कम रुपये पाचशे फक्त) दयावेत. तद्नंतर सामनेवाला क्र.१अ ते १इ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.02.20 18:30:31 +0530

**(संध्या यु. सुळ)**

ठिकाण- नेवासा
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,

दिनांक – २०/०२/२०२५
क.स्तर, नेवासा